Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# ग्रामीण भारतातीलआदिवासी महिलांचे सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण

प्रतिमा मा सुर्यवंशी
राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय, आलापल्ली जि.अहेरी
*Corresponding Author: Pratimasuryawanshi46@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :–**

गेल्या दशकभरात लैगिंग समानता आणि महिला सक्षमीकरण हे केवळ राष्ट्रांच्या आरोग्यासाठीच नव्हे तरसामाजिक आणि आर्थिक विकासासाठीही महत्वाचेम्हणुन ओळखले जाते. आदिवासी महिलांचे सक्षमीकरण हा जगभरातील विकास प्रक्रियेतील एक महत्वाचा मुद्दा आहे. कारण हि एक बहुआयामी आणि बहुस्तरीय संकल्पना आहे. म्हणुन आदिवासी महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता कोणत्याही समाजातील सामाजिक व आर्थिक विकासात त्या महिलांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. तर खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होईल. महिला सक्षमीकरण हि एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये महिलांना भौतिक, मानवी आणि बौध्दिक संसाधनावर तसेच घर, समुदाय, समाज आणि राष्ट्रांतील .निर्णय घेण्याकरिता आर्थिक नियंत्रण मिळते. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणामध्ये अनेक कारणामुळे अडथळे निर्माण होतात त्यात प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक, राजकीयसांस्कृतिक, भावनिक व तांत्रिक अडथळेआहेत. तसेच त्यांच्यात असलेली अंधश्रध्दा साक्षरतेचा अभाव, सामाजिक व सांस्कृतिक घटक, पारंपारिक मुल्ये, नविन तंत्रज्ञानाचा अभाव आणि माहितीची कमतरता,रोजगाराचाअभाव, आरोग्याच्यासमस्या,व्यवसाय क्षेत्रातील मागासलेपणा हे आहेत.

**बीजसंज्ञा :–** सक्षमीकरण, आदिवासी महिलांचेसक्षमीकरण, सामाजिक व आर्थिक स्थिती, शिक्षणाची भुमिका, शासकीय योजना, सक्षमीकरणातील अडथळे.

## प्रस्तावना :–

सक्षमीकण ही एक बहुआयामी प्रक्रिया असुन जी लोकांच्या जीवनावर त्यांच्या समुदायावर आणि समाजावर नियंत्रण मिळविण्यास मदत करते. समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारणे हे प्रत्येक समाजाच्या सामाजिक न्यायाचे एक महत्वपुर्ण प्रतिबिंब आहे.भारतातील महिला सक्षमीकरण हि अनेक भिन्न-भिन्न बदलांवर अवलंबुन आहे. ज्यात प्रामुख्याने भौगोलिक स्थिती, ग्रामीण शहरी भाग, शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती, आरोग्य, आर्थिक संधी, लिंग आधारित हिंसाचार आणि राजकीय सहभाग यामध्ये असलेले अंतर व भेद आहे.

आज महिलांचे सक्षमीकरण हि २१ व्या शतकातील महत्वाची चिंता आहे परंतु प्रत्यक्षात ती अजुनही कोसो दुर आहे आणि वरवर ऐकण्यापरती आहे. महिल सक्षमीकरण हा महिलांना सक्षम करण्याचा मार्ग आहे. सक्षमीकरण हे अनेक दृष्टीकोनातुन स्पष्ट केल्या जावु शकते. त्यात प्रामुख्याने महिलांना बळकट करणे, लैगिंक समानता, आत्मविश्वास व स्वावलंबी बनविण्यासाठी, निर्णय घेण्याची अधिक स्वायतता असणे ज्यामुळे त्यांच्यात जिवनाचे नियोजन करण्याची क्षमता निर्माण करते. कारण कोणत्याही समाजाचे कल्याण आणि विकास हा त्या देशातील त्या समाजातील महिला

सक्षमीकरणावर अवलंबुन असते महिला सक्षमीकरणाशिवाय समाजाचा विकास योग्य दिशेने आणि अपेक्षित गतीने होणे शक्य नाही असे म्हटल्यास वागवे होणार नाही. कारण जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास ५०टक्के या महिला आहेत. परंतु भारताने असमान लिंग गुणोत्तर दाखविल्यामुळे स्त्रियांची लोकसंख्या हि पुरूषांच्या तुलनेने कमी आहे. त्याची सामाजिक स्थिती हि पुरूषांच्या बरोबरीत नसल्यामुळे त्या आजही लैगिंग भेदभावाला बळी ठरतात. त्या तुलनेने पाश्चिमात्य समाजात स्त्रियांना जिवनाच्या सर्व क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने अधिकार व स्थान मिळालेले आहे.

भारतीय राज्यघनेने महिला आणि पुरूषांना समान अधिकार बहाल केले आहेत हे आपल्या सर्वांना माहिती आहे. तसेच लिंगाच्या आधारावर भेदभाव करणे निषिध्द आहे. तरीसुध्दा गेल्या १७५ वर्षापासुन अनेक शतकानुशतके स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या रूढी आणि प्रथा त्यांना प्रगतीकरू देत नाही. या अशा परंमपरेमुळे त्यांच्या तावडीतुन स्त्रियांना मुक्त करण्यासाठी अनेक कायदे केलेले आहेत तरिही आपल्याला असे दिसुन येते की, आजही अनेक स्त्रियांना जन्मापासुन ते मृत्युपर्यंत भेदभावाचा सामना करावा लागतो म्हणुन महिलांचे सक्षमीकरण हि मुलत: समाजातील पांरपारिकपणे वंचित असलेल्या महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्थितीचि उन्नतीची प्रक्रिया आहे. म्हणुन महिला सक्षमीकरणाची एकंदरित स्थिती हि एका परिमानाने पाहिल्या जावु शकत नाही तर त्याऐवजी महिलांच्या जिवनातील विविध घटकांच्या संदर्भात त्यांचे मुल्यांकन करणे गरजेचे आहे तरच त्यांची स्थिती स्पष्ट समजेल.

**महिला सक्षमीकरणाची संकल्पना :-**

सक्षमीकरणाची संकल्पना हि लोक आणि समाजामध्ये स्वायतता आणि आत्मनिर्णयाची पातळी वाढवते. सक्षमीकरण हा शब्द महिलांच्या संबंधात मोठया प्रमाणावर वापरला जात आहे. सक्षमीकरणाची प्रक्रिया व्यक्तीला जिवनाच्या सर्व क्षेत्रात त्याची संपुर्ण ओळख आणि सामर्थ्य ओळखण्यास सक्षम करते.महिला सक्षमीकरण महिलांना तिचे अधिकार समजुन घेण्यासाठी आणि स्वत:च्या आणि इतराप्रती असलेल्या तिच्या जबाबदाऱ्या अत्यंत प्रभावीपणे पार पाडण्यासाठी शक्ती देते. महिलांच्या सक्षमीकरणाची संकल्पना लिंग समानतेवर सुध्दा आधारित आहे म्हणुन ती एक दिर्घकाळ आखलेली जागरूकआणि सतत चालणारी प्रक्रिया आहे. ज्यामध्ये प्रामुख्याने कौशल्य वाढविणे, क्षमता वाढविणे, आत्मविश्वास वाढविणे आणि निर्णय घेण्यामध्ये अर्थपुर्ण सहभाग यांचा समावेश होतो मुख्यत: कोणत्याची समाजाचा विकास हा महिला सक्षमीकरणावर अवलंबुन असतो

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांच्या अंगी असणारी दुर्बलता नष्ट करून स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करणे व स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक, धार्मिक,राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात समानता प्रस्थापित करणे तसेच महिलांना समान हक्क व समान संधी देवुन त्यांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी व स्वंयपुर्ण बनविणे आणि त्यांना सन्मानाने आणि प्रतिष्ठेचे जिवन जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे.

**अभ्यासाची उद्दिष्टे:-**

१) आदिवासी महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

२) सामाजिक, आर्थिक,राजकीय व शैक्षणिक कार्यात महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

३)आदिवासी महिलांना सक्षम बनविण्यासाठी शासनाच्या योजना व कायदयांचा अभ्यास करणे.

४)आदिवासी महिलांच्या सक्षमिकरणात येणाऱ्या अडचणीना समजुन घेणे.

**आदिवासी समाजातील महिलांचे सक्षमिकरण :-**

भारत हा आदिवासी लोकांचा सर्वात मोठा देश आहे. आदिवासी समाजातील स्त्रिया त्यांच्या सामाजिक,आर्थिक, व सांस्कृतिक जिवनपध्दतीत महत्वाची भुमिका बजावतात. परंतु शिक्षण, रोजगाार चांगले आरोग्य, तंत्रज्ञान आणि आर्थिक सक्षमीकरण या सारख्या विविध क्षेत्रात त्या अजुनही फार मागे आहेत. आदिवासी महिलांचे सक्षमीकरण हा जगभरातील विकास प्रक्रियेतील एक महत्वाचा मुद्दा आहे.

आदिवासी स्त्रिया आर्थिक दृष्टया गरीब आणि सामाजिकदृष्टया मागासलेल्या दर्जाच्या जिवनाच्या निम्न स्तरावर जगतात. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणामध्ये अनेक कारणांमुळे अडथळे निर्माण होतात त्यात प्रामुख्याने सामाजिक, राजकीय, भावनिक तांत्रिक अडथळे तसेच अंधश्रध्दा, साक्षरतेचा अभाव, सांस्कृतिक घटक, पांरपारिक मुल्ये, नविन तंत्रज्ञानाचा अभाव व माहितीची कमतरता हे आहेत. आदिवासी महिलांना अनेकदा अन्न सुरक्षितता, कुपोषण, आरोग्य सेवा, शिक्षणाचा अभाव, घरघुती हिंसाचार अशा समस्यांना तोंड द्यावे लागते आहे.

इतके असुनही शेती आणि आर्थिक संसाधने ज्यात प्रामुख्याने पीक उत्पादन आणि पशुधन या कार्यात आदिवासी स्त्रियांची मोठी भुमिका आहे कारण त्या फार कष्टाळु आहेत. तसेच आदिवासी महिलांना स्थानिक वातावरणासह पारंपारिक जिवनशैली जगण्यासाठी आणि नैसर्गिक व्यवसायांवर आधारित व्यवसाय निवडण्यासाठी स्वत:ला समायोजित केले आहे. तरिसुध्दा त्या अजुनही भारतातील इतर सर्वसामान्य स्त्रियांपेक्षा मागासलेल्या आहेत. आदिवासी

महिलांच्या सक्षमीकरणात अज्ञान आणि निरक्षरता मोठी भुमिका बजावते सर्वसामान्यपणे आदिवासी समाजात महिलांना ज्ञान जागृती विकास आणि प्रगतीच्या शिडीवर चढण्यासाठी वेगवेगळे मार्ग जसे की त्यांच्या शिक्षण, आरोग्य आणि जिवनाच्या सामाजिक आर्थिक पैलुवर परिणाम करण्यासाठी सरकारी धोरण स्वंयसेवी संस्था यांच्या उपक्रमामध्ये सुधारणा आणि विकासाची आवश्यकता आहे.

**आदिवासी महिला आणि शिक्षण :–**

आदिवासी स्त्रिया सर्वत्र समाजातील सर्वात वंचित आणि उपेषित घटक आहे.आदिवासी महिलांचे शैक्षणिक मागासलेपणा हे आदिवासी महिलांच्या मागासलेपणाला । गती देणारे एक महत्वाचे घटक असल्याचे दिसते. म्हणुन आदिवासी महिलांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आणि लाभ घेण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामुळे स्त्रियांना त्यांची साक्षरता कौशल्ये, चांगली स्वच्छता, कौटुंबीक आरोग्याची काळजी घेणे त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी त्याच्या व्यावसायीक कौशल्याचा विकास करण्यासाठी लढा देण्यासाठी आणि त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या गैरसोय आणि लिंग भेदभावावर विजय मिळविण्यासाठी हे गरजेचे आहे.म्हणुन आदिवासी महिला जेव्हा शिक्षित होतील तरच त्याचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होईल. शिक्षणामुळे महिलांची जागरूकता वाढेल आणि त्यांच्या सर्वांगीण विकास होवुन राष्ट्राची प्रगती होण्यास मदत होईल.

शिक्षणाद्वारे आदिवासी महिला सक्षमीकरण हे सर्वसमावेशक वाढीचे संभाव्य माध्यम आहे त्याचा थेट परिणाम आदिवासी विकासाच्या विविध पैलुवर होत आहे. आदिवासी महिलांचे सक्षमीकरण केल्याशिवाय देशाचा अर्थपुर्ण सर्वसमावेशक विकास शक्य नाही. आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणाचे मोजमाप त्यांच्याकडे असलेल्या उत्पन्न मिळविण्यासाठी आर्थिक संसाधनापेक्षा जास्त असलेली शक्ती आणि त्यांचे दरडोई उत्पन्न, शिक्षणात प्रवेश, व्यावसायिक संधीची उपलब्धता आणि आर्थिक निर्णय घेण्यामध्ये सहभाग आणि राजकीय संधीपर्यंत पोहचणे याद्वारे मोजले जावु शकते.आदिवासी महिलांच्या, सामाजिक आर्थिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी शिक्षणाची उपलब्धता हि महत्वपुर्ण गुरूकिल्ली आहे. शैक्षणिक प्राप्तीमुळे महिलांची सध्याची सामाजिक राजकीय रचना आणि त्यांच्या विकासातील अडथळयाबद्दलची समज वाढणे अपेक्षितआहे. आदिवासी महिलांना शिक्षणाद्वारे सक्षम बनविल्यास राष्ट्रीय विकासात मोठा हातभार लागेल. आदिवासी महिलांचा शैक्षणिक दर्जा इतर समाजातील महिलांच्या तुलनेत खुपच कमी आहे. शिक्षण हे राष्ट्रीय विकासाचे व प्रगतीचे शक्तीशाली साधन आहे. यात आदिवासी महिलांचा दर्जा उंचावण्याची शक्ती आहे. शिक्षण हे उपेक्षित

आदिवासी महिलांना सक्षम करण्याचे साधन आहे.

सध्याच्या परिस्थितीत आदिवासी महिलांचे सक्षमीकरण हा आव्हानात्मक मुद्दा आहे कारण " विकास प्रक्रियेत पुर्णत: सहभागी होण्यासाठी आवश्यक ज्ञान कौशल्ये आणि आत्मविश्वासाने महिलांना सक्षम बनविण्याचे सर्वात महत्वाचे माध्यम म्हणजे शिक्षण'' यामुळे उच्च उत्पादकता, कार्यक्षमता आणि चांगला सामाजिक, आर्थिक विकास होतो.

**आदिवासी महिलाची सामाजिक- आर्थिक स्थिती आणि अधिकार यांच्यातील सबंध:-**

कोणत्याही समाजातील स्थिती आणि महिला सक्षमीकरण याचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. महिलांची स्थिती विविध सामाजिक आर्थिक घटकांच्या आधारावर निर्धारित केली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्रियांची स्थिती व त्यांचे उत्पन्न स्तर, रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि प्रजनन क्षमता तसेच कुंटुबातील व सामाजातील त्यांच्या भुमिका एकुणच आदिवासी समुदायामध्ये स्त्रियांची भुमिका महत्वपुर्ण आहे व त्या एकुण लोकसंख्येच्या महत्वपुर्ण आहे. व त्या एकुण लोकसंख्येच्या निम्ने आहेत तसेच आदिवासी समाजातील स्त्रिया इतर सामाजिक गटापेक्षा अधिक महत्वाच्या आहेत. कारण त्या अधिक कष्ट करतात आणि कुंटुबाची अर्थव्यवस्था आणि व्यवस्थापन त्यांच्यावर अंवलबुन असते त्यामुळे महिलांच्या अधिकाराची आणि त्यांच्या सामाजिक,आर्थिक वैशिष्टयांची तुलना पुढीलप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१)निर्णय घेण्याची भुमिका :-**

निर्णय घेण्याची शक्ती महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टिकोणातुन अत्यंत महत्वाची आहे. महिलांच्या निर्णयशक्तीकडे दुर्लक्ष होता कामा नये, कारण महिलांच्या सक्रीय सहभागाशिवाय खरा विकास होवु शकत नाही, त्यामुळे कौटुंबिक सामाजिक, आर्थिक, आणि सामुदायिक राजकीय सर्व क्षेत्रात महिलांच्या सहभाग होणे गरजेचे आहे.भांडवलशाही देशातील एन.एस.एस.ओ. च्या मते ७१ टक्के - ७५ टक्के स्त्रिया या संघटनेत सहभागी होतात. भारतात केवळ ४० टक्के स्त्रिया या संघटनेत सहभागी होतात म्हणुन महिलांना निर्णय शक्तीपासुन वंचित ठेवता कामा नये कारण महिलांच्या सक्रिय सहभागाशिवाय देशाचा तसेच समाजाचा विकास होवु शकत नाही.

**२) आर्थिक निंबंध :-**

आर्थिक सक्षमीकरणाचा मुद्दाही समानतेच्या स्वातंत्र्याशी जोडलेला आहे. आदिवासी स्त्रिया या आर्थिक दृष्टया मागासलेल्या दर्जाच्या जिवनमानाच्या निम्न स्तरावर जगतात. अनेकदा त्यांना अन्न सुरक्षितता, कुपोषण, आरोग्य सेवा आणि शिक्षणाचा अभाव या समस्यांचा सामना करावा लागतो. तसेच कौटुंबिक हिंसाचार आणि बलात्काराला सुध्दा बळी पडावे लागते जरी आपण या २१

व्या शतकातील आदिवासी समाजात आहेत तरीसुध्दा आदिवासी महिला सोशल नेटवर्किंग मध्ये खुप मागे आहेत.

**३) वैवाहिक स्थिती आणि वय :-**

कोणत्याही समाजातील महिलांमध्ये स्वायत्तेची पातळी ठरविणारा एक महत्वाचा घटक म्हणजे वैवाहिक स्थिती, वैवाहिक स्थिती दर्शविते की एखादी व्यक्ती विवाहित अविवाहित किंवा विधवा आहे किंवा नाही. आपल्या समाजात पुरूषांचे वर्चस्व असलेल्या बहुसंख्य विधवा ज्या कुंटुंबाची कमाई गमावतात त्यांनी कुंटुंबाची सुंपुर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली आहे. आणि संशोधनातुन असे दिसुन येते की, विधवा महिलांमध्ये इतरापेक्षा निर्णय घेण्याची शक्ती अधिक असते.त्यांना सुरक्षितता व असहकार इत्यादीचा सामना करावा लागतो अविवाहित महिलांच्या तुलनेत विवाहित महिलांची निर्णय घेण्याची भुमिका कमी असतेआदिवासी समाजात स्त्रियांचे लग्नाचे वय काय आहे याची माहिती नसल्यामुळे लवकर लग्न करणे, लवकर लग्न केल्यामुळे त्यांना त्यांच्या शिक्षणासाठी पुरेसा वेळ मिळत नाही ज्यामुळे त्यांच्या वैवाहिक जिवनावर वाईट परिणाम होतो त्या अनेक आरोग्य विषयक समस्यांना बळी पडतात.

**४) महिला सुरक्षा :-**

सध्याच्या काळात घरघुती हिंसाचार, शोषन, हत्या या सर्व घटना समुदाय स्तरावर आणि राज्यस्तरावर पाहायला मिळत आहे. त्यामुळे भारतातील महिला सुरक्षिततेला धोका आहे तसेच लहान प्रमाणात लैगिंक अत्याचार व बालशोषण आणि शारीरिक अत्याचाराचे गुन्हे नोंदविले गेले आहेत. तसेच मुलींचे आरोग्य,पोषण आणि शिक्षणाच्या बाबतीत सुध्दा भेदभाव केला जातो.या सर्व प्रकारच्या हिंसाचार व गुन्हयांचा पोलीस व न्यायालयीन व्यवस्थेतुन कायद्याची अमलबंजावणी अजुनही कमी आहे.

**५) रोजगार आणि उत्पन्न :-**

रोजगाराच्या स्वरूपाचे गंभीर विश्लेषण स्त्रियांची आर्थिक उदासिनता समजुन घेण्यास मदत करते आर्थिक स्वातंत्र्य महिलांना स्वत:चे निर्णय घेण्यास सक्षम करते आणि रोजगारामुळे कौटुंबिक उत्पन्नता महिलांचा वाटा हा एक महत्वपुर्ण मानला जातो. ज्यामुळे महिलांच्या निर्णय घेण्याच्या भुमिकेवर परिणाम होतो यामुळे महिला आर्थिक बळकट होवुन त्या स्वत:चा व कुंटुंबाचा विकास साधु शकतात.

**महिला सक्षमीकरण आणि घटनात्मक तरतुदी :-**

शतकानुशतके भेदभाव आणि शोषणामुळे स्त्रियांना भेडसावलेल्या सामाजिक, आर्थिक,शैक्षणिक आणि राजकीय तोटे घटनेच्या लिंग समानता आणि भेदभाव न करण्याचा संदर्भ देणारे विशिष्ट लेख आहेत. राज्यघटनेच्या आदेशानुसार महिलांच्या कायदयेशिर सक्षमीकरणाच्या दिशेने राज्याने कायदेविषयक अनेक उपाययोजना राबविल्या

आहेत. महिलांच्या प्रतिष्ठेचे उल्लंघन किंवा अपमान करणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या वर्तवनुकि विरूध्द दंडात्मक मंजुरी निर्माण करून काही विद्यमान कायद्यामध्ये काळाच्या गरजेनुसार सुधारणा आणि बदल करण्यात आले आहेत. भारतीय राज्यघनेत महिलांनापुरूषांच्या बरोबरीने बनविण्यासाठी अनेक तरतुदी केलेल्या आहेत.

१) संविधानाचे कलम १४ नुसार सर्व कायद्यांचे समान संरक्षण आणि कायद्यानुसार समानतेची हमी देते.

२) कलम १५ (३) नुसार राज्याला महिलासाठी विशेष तरतुदी करण्याचा अधिकार देते.

३) कलम १६ (२) नुसार धर्म, वंश, लिंग, किंवा जात या आधारावर कोणत्याही नागरिकाला राज्याच्या अंतर्गत कोणत्याही नोकरीसाठी भेदभाव करता येणार नाही किंवा अपात्र करू शकत नाही.

४) घटनात्मक ७४ वी घटनादुरूस्ती कायदा १९९२ कलम २४३ हि नुसार महानगरपालिका १६३ जागा महिलासाठी राखीव असतील.

५) कलम २३ मानवाच्या वाहतुकीवर बंदी आणि सक्तीचे श्रम तसेच अनुच्छेद ३९ (अ) नागरीक पुरूष आणि महिला यांना समानतेचा अधिकार आहे.

६)कलम ४० (७३व्या घटनादुरूस्तीनंतर) पंचायतीमधील १/३जागा महिलासाठी राखीव असतील.

७) अनुच्छेद ४२ व्या राज्य न्याय आणि मानवी कामासाठी तरतुद करेल त्यात परिस्थिती आणि प्रसुत आराम.

८) कलम ५१ अ (ई) प्रत्येक नागरिकांच्या कर्तव्यापैकी एक म्हणजे प्रथा सोडणे, स्त्रिया प्रतिष्ठेला अपमानास्पद.

९) उत्तराधिकार (सुधारणा) कायदा २००५ महिलांना वडिलापार्जित

मालमत्तेत समान वाटाकिंवा समान मोबदला,१९६१ हंडा बंदी कायदाए १९५४ विशेष विवाह कायदाए२००७, बालविवाह प्रतिबंधक कायदा,१९६९ भारतीय घटस्फोट कायदा,१९८६ निषेध कायदा (महिलांचे अशोभनिय प्रंतिधित्व प्रतिबंध),१९५५ हिंदु विवाह कायदा,१८६१मातृत्व लाभ कायदा,१९७१ वैद्यकीय समाप्ती गर्भधारणा कायदा,२०१३ कामाच्या ठिकाणी महिलांचा लैगिंक छळ (प्रतिबंध आणि निवारण)कायदा २०१३,१९७६ समान मोबदला कायदा.

**निष्कर्ष :–**

आपल्या राज्यघटनेची प्रस्तावना ज्या समता आणि न्यायाविषयी बोलते ती प्राप्त करण्यात आपण अजुनही खुप मागे आहोत. खरी समस्या आपल्या समाजातील पुरूषप्रधान व्यवस्थेची आहे जी महिलांना पुरूषांच्या

अधिन मानते आणि त्यांना अधिन करण्यासाठी विविध प्रकारच्या पध्दती निर्माण करते. आपण समाजातील पुरूष सदस्यांना महिलांच्या प्रश्नाबाबत शिक्षित आणि संवदेनशील बनविण्याची आणि त्यांच्यामध्ये एकजुटीची तसेच समानतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे जेणेकरून ते त्यांच्या भेदभावाच्या प्रथा बंद करतील. हे घडण्यासाठी शासनव्यतिरिक्त विविध स्वयंसेवी संस्थाकडुन आणि देशातील सुबुध्द नागरीकांकडुन प्रयत्नांची गरज आहे आणि त्यासाठी सर्वप्रथम प्रयत्न आपल्या घरापासुन सुरू झाले पाहिजेत जिथे आपण आपल्या कुंटुबातील महिला सदस्यांना शिक्षण, आरोग्य, पोषण आणि निर्णय घेण्याच्या समान संधी उपलब्ध करून देवुन सक्षम केले पाहिजे कारण भारताने खऱ्या अर्थाने महिलांना सक्षम केले तरच ते शक्तीशाली राष्ट्र बनु शकेल.

**संदर्भ :-**

Sindhi swaleha (2012),“ prospects & challenges in Empowerment of tribial women ” IOSR Journal & Humanities & Social Science (JHSS) Volume 6, Issue1.

Singh Shailesh kumar, Singh Meera & Rashmi Rakesh (july 2019),“ Women Empowerment Emerging Dimension & Issues” Delhi ABS Books Publication.

Mandot Manju, Dwivedi Veen, Jat lalram & Choudhary Sunil (2013), women Emporment status &perspective ” New delhi, Himanshu publication.

Banu zenab (2001),“ Tribal Women empowerment and gender issues ” New Delhi , Kanishka publisher distributors.

Kumar raj (2011),“ women empowerment ” New Delhi, Neha publishers and distributors.

Kuma s (2018),“ Empowerment of Tribal women” New Delhi ALP Books Publication.

Hazra Ayan (2014),“Empowerment of tribal women” New Delhi Serials publications.

Das RashmiRekha& Mahapatra padmalaya (sept 2017),“ Empowerment of Tribal women in odisa” An analytical perspective(IJDR) International journal of development Reserch volume 07, Issue 09.

Dar Arshid Ahmad “ Women Empowerment Issues Challenges & strategies in India” (IRIMST) International Research journal of management science &Technology. Volume 05 Issue : 01

Chandra Shradha (2018), “Status of women Empowerment in india” (IRJMSH) International Research journal of management sociology & Humanities. Volume 09, Issue 12.

Bhukya Ramu (April 2015),”Empowerment of Tribal Women in India”(IJOR) Indian Journal of Reasearch,Volume 04,Issue 04.

रानी आशु (१९९७), “ महिला विकास कार्यक्रम ’’ नवी दिल्ली इना श्री पब्लीकेशन.

कच्छल दिपिका मुख्य संपादक (ऑक्टोबर २०१८), “ विकास समर्पित मासिक“योजना” महिला सक्षमिकरण वर्ष ४६ अंक : ०३